N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** शिरोळ **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0077 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 12/02/2020 02:53 बजे

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** मंगलवार

**Date From (दिनांक पासून):** 11/02/2020

**Time Period (कालावधी):**

**Date To ( दिनांक पर्यंत):** 11/02/2020

**Time From (वेळेपासून):** 13:31 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 17:25 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 12/02/2020 **Time (वेळ):** 02:30 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 004 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 12/02/2020 02:53 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर, 0.050 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जुन्या महसुल भवन, शिरोळ,पहिल्या मजल्यावरील दक्षिण बाजु, शिरोळ,शिरोळ

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** रोहित भुपाल मगदुम

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** भुपाल मगदुम

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990 (d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ. क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | उमळवाड , शिरोळ,शिरोळ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | उमळवाड , शिरोळ,शिरोळ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):** 91-9850771686

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | आयुबखान दस्तगीर देसाई | | वडील का नाम : दस्तगीर देसाई | 1. एस टी स्टण्डजवळ, शिरोळ,कोळी गल्ली, शिरोळ,,शिरोळ,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | अमोल प्रशांत कोळी | | वडील का नाम : प्रशांत कोळी | 1. आगर रोड,शिरोळ, धनगरवाडा,शिरोळ,,शिरोळ,,शिरोळ, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | स्विकारलेली रक्कम 1,60,000/ रू. | 160,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):** 160,000.00

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ. क्र.) | UIDB Number (यु.आय.डी. बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक- 12/02/2020 मी रोहीत भुपाल मगदूम, वय-30, व्यवसाय-शेती, रा. मु.पो.उमळवाड, ता.शिरोळ, जि.कोल्हापूर, मो.नं. 9850771686, आज रोजी समक्ष पोलीस ठाणेत हजर राहून फिर्याद देतो की, मी वरील गावचा रहिवाषी असुन गावी मी माझे कुटूंबीयांसह एकत्रीत राहणेस आहे. आमची उमळवाड ता.शिरोळ, जि.कोल्हापूर येथे गट नंबर- 453/3 मध्ये माझे वडीलांचे नांवे 28.75 आर इतकी वडीलोपार्जित शेतजमीन आहे. माझे ओळखीचे किरणकुमार धनपाल कुंभार, रा.अंकली, जि.सांगली यांची अंकली येथे विटभट्टी आहे. त्या विटभट्टी करीता त्यांना आमच्या शेतजमिनीमधून 500 ब्रास माती देणार आहे. त्याकरीता शासनाची परवानी आवश्यक असते. त्यामुळे किरणकुमार कुंभार यांच्या नांवाने मा.तहसीलदार, तहसील कार्यालय, शिरोळ यांचेकडे आमच्या शेततजमीनीमधून 500 ब्रास माती उत्खनन करणेची परवानगी मिळणेकरीता मी कुंभार यांचेमार्फत सविस्तर अर्ज दिला आहे. आम्ही दिलेल्या अर्जाप्रमाणे संबंधीत सर्कल अधिकारी हे प्रत्यक्ष माती उत्खननच्या ठिकाणी येवून सविस्तर पंचनामा करतात आणि माती उत्खनन करणेसाठी परवानगी मिळणेकरीता सविस्तर अहवाल तहसिलदार यांना सादर करीत असतात, त्याप्रमाणे आम्ही दिलेला अर्ज हा तहसिलदार कार्यालय शिरोळ यांनी सर्कल देसाई यांचेकडे पाठविणेत आला होता. त्या अर्जाप्रमाणे सर्कल देसाई यांनी आवश्यक ती कागदपत्रे मागणीसाठी किरणकुमार कुंभार यांना दिनांक 10/01/2020 रोजी नोटीस काढुन त्या नोटीसप्रमाणे उमळवाड तलाठी कार्यालयात हजर राहणेस सांगितले. ज्या शेतजमीनीमधून माती उत्खनन करणार आहे, त्या शेत जमिनीचे मुळ मालक माझे वडील असल्याने त्यांचा मुलगा या नात्याने मी आमच्या ज्या शेती जमिनीमधून माती उत्खनन करणार त्याची सर्व कागदपत्रे घेवून दिनांक 23/01/2020 रोजी संबंधीत सर्कल देसाई यांचेकडे जमा केली. दिनांक 06/02/2020 रोजी माझी व सर्कल आयुबखान देसाई यंाची भेट झाली. त्यावेळी मी त्यांना आमच्या शेतजमीनीमधील 500 ब्रास माती उत्खननासाठी किरण कुंभार यांच्या नांवाने दिलेल्या अर्जाप्रमाणे माती उत्खनन करणेची परवानगी (रायल्टी) निघाली काय? म्हणून विचारले. त्यावेळी त्यांनी मला शासकीय परवानगीसाठी (रायल्टीसाठी) शासकीय फी 80,000/- रूपये भरावे लागणार आणि मला त्याच्या डब्बल म्हणजे 1,60,000/- रूपये द्यावे लागतील. तरच मी तुमच्या शेतजमिनीमधून 500 ब्रास माती उत्खनन करणेसाठी शासनाची परवानगी मिळणेबाबतचा पूरक असा प्रस्ताव/अहवाल कागदपत्रासह तहसिलदार शिरोळ यांना पाठविणार, नाहीतर पूरक असा अहवाल पाठविणार नाही असे सांगितले. त्यावेळी मी त्यांना नाईलाजस्तव पैशाची जुळणी झाली की, येवून भेटतो असे सांगून तेथुन निघून आलो होतो. त्यानंतर मी जयसिंगपूरचे सर्कल आयुबखान देसाई यांनी मागणी केलेल्या

रक्कमेबाबत विटभट्टीचे मालक किरणकुमार कुंभार यांचेषी चर्चा करून मी सर्कल देसाई यांचेविरुध्द अन्टी करप्षन ब्युरो, कोल्हापूर येथे समक्ष जावुन तक्रारी अर्ज दिला होता.मी दि. 10/02/2020 रोजी सर्कल देसाई यांना भेटणेस जाणार असल्याने अन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर कडील पोलीस निरीक्षक श्री. जितेंद्र पाटील यांनी मला दि. 10/02/2020 रोजी सर्कल देसाई कोठे भेटणार याबाबत विचारणा केली. त्यानुसार मी पोनि पाटील यांना दि. 10/02/2020 रोजी सर्कल देसाई हे सर्कल कार्यालयात आलेत की नाही? याची खात्री करून आपणास कळवतो तेव्हा आपण त्याठिकाणी येवुन कारवाई करा अशी विनंती केली. त्यानंतर पोनि पाटील यांनी त्यांचेशी संपर्कात राहणेस सांगुन माझे तक्रारीबाबत मला गोपणीयता राखणेच्या सुचना देवुन मला घरी पाठविले होते.त्यानंतर दि. 10/02/2020 रोजी पोनि पाटील साहेबांनी मला सकाळी 11.00 वा चे सुमारास सर्कल देसाई हे कार्यालयात आलेत की नाही? याबाबत विचारणा केली. तेव्हा मी त्यांना सर्कल देसाई हे तहसीलदार कार्यालय शिरोळ येथे असल्याचे सांगुन पोनि पाटील साहेबांना त्यांचे स्टाफसह मला चौंडेश्वरी सुत गिरणीसमोरील मंगोबा देवालयाजवळ जयसिंगपूर येथे येवुन भेटा, मी माझे फोर्ड आयकान कार नंबर- डभ्.04.क्.1698 ने आपणास तेथे येवुन भेटतो असे सांगितले होते. त्यानंतर थोडयावेळाने पाटील साहेबांनी मला माझे मोबाईल फोनवर फोन करून पांढरे रंगाचे टाटा सुमो गाडीने मंगोबा देवालयाजवळ येत असल्याचे सांगितलेने त्यामुळे मी लागलीच मंगोबा देवालयाजवळ जावुन थांबलो होतो. थोडयावेळाने पाटील साहेब व त्यांचेकडील स्टाफ त्यांचेकडील टाटा सुमो गाडीने तेथे आले होते. मी त्यांचे गाडीजवळ गेलेवर पाटील साहेबांनी मला त्यांचेकडील गाडीमध्ये बोलवुन घेवुन माझी ओळख सांगून त्यांचेकडील स्टाफ व पंचांची ओळख करुन दिली. त्यानंतर त्यांनी माझी तक्रार पंचांना सांगणेची सुचना दिली. त्याप्रमाणे मी माझी तक्रार पंचांना सांगितली. त्यानंतर श्री.पाटील साहेबांनी माझी दि. 07/02/2020 रोजी त्यांना दिलेली लेखी तक्रार पंचांना वाचावण्यास दिली. मी सांगितलेली तोंडी तक्रार व लेखी तक्रार एकच असलेची पंचांची खात्री झाली. त्यानंतर श्री.पाटील साहेबांचे सुचनेनुसार दोन्ही पंचांनी माझे लेखी तक्रारीखाली सह्या केल्या. मी पोनि पाटील यांचेकडे तक्रारी अर्ज दिला तेव्हाच त्यांनी त्यांची सही माझे तक्रारी अर्जावर केली होती.श्री.पाटील साहेबांनी मला व दोन्ही पंचांना जयसिंगपूर भागचे सर्कल देसाई हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले. तसेच पडताळणीकरीता मी सर्कल देसाई यांना भेटणेस जाताना माझेसोबत पंच श्री.सुतार यांना पाठवणार असल्याचे सांगितले. त्यानंतर त्यांनी शासकीय वाहनामध्येच त्यांचे कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर काढून त्यामध्ये नवीन सनडिस्क कंपनीचे 8 जीबीचे मायक्रो एसडी कार्ड घालून त्यामध्ये पुर्वीचे कोणत्याही प्रकारचे संभाषण ध्वनिमुद्रीत नसल्याची खा◌ं◌ं◌ंत्री करून दिली. मला व पंच श्री.सुतार यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 12.48 वा.चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस सोनेरी चेनच्या सहायाने अडकवून दिला व मला आणि पंच श्री.सुतार यांना माझेकडील फोर्ड आयकान कारने शिरोळ येथील महसुल भवनमध्ये सर्कल देसाई यांची भेट घेणेकरीता पाठविले. तेथे जावुन मी सर्कल देसाई यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला, पण देसाई तेथे उपस्थित नव्हते. त्यामुळे मी माझे मोबाईल फोनवरून सर्कल देसाई यांना 13.16 वा फोन केला, तेव्हा त्यांचा मोबाईल व्यस्त लागला. काही वेळातच म्हणजेच 13.17 वा त्यांचा परत फोन आला, तेव्हा मी माझा फोन लाउड स्पिकरवर टाकुन त्यांचेशी बोललो. त्यावेळी सर्कल देसाई यांनी मला बकेत  असल्याचे सांगुन महसुल भवनाचे तळमजल्यावरील खोलीमध्ये थांबणेस सांगितले. त्याप्रमाणे मी व पंच सुतार त्यांची वाट पाहत त्यांनी सांगिलेल्या खोलीमध्ये बसलो. थोडयावेळाने तेथे सर्कल देसाई आले, तेव्हा त्यांचेत व माझेत माझे रायल्टीचे कामाबाबत चर्चा झाली. चर्चे दरम्यान त्यांनी आमचेकडील अर्जदार किरणकुमार कुंभार यांचा जातीचा दाखला, आधार कार्ड व शाळा सोडलेचा दाखला अशा कादपत्रांच्या झेराक्स टुकापी करून घेवुन उद्या म्हणजे दि. 11/02/2020 रोजी सर्कल कार्यालय, जयसिंगपूर येथे येण्यास सांगितले. त्यामुळे मी व पंच सुतार असे तेथुन निघुन पोनि पाटील साहेब व त्यांचा स्टाफ थांबले ठिकाणी मंगोबा देवालयाजवळ माझे कारने निघुन आलो होतो. तेव्हा पाटील साहेबांनी मला त्यांचेकडील गाडीमध्ये बोलवुन माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर  14.01 वा. बंद करुन आपले ताब्यात घेतला. त्यानंतर श्री.पाटील साहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांना पंच सुतार यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगुन मला सर्कल देसाई यांनी कुंभार यांचा जातीचा दाखला, आधार कार्ड व शाळा सोडल्याचे दाखल्याची झेराक्स टुकापी करून उद्या दि. 11/02/2020 रोजी 10.00 वा सर्कल कार्यालय, जयसिंगपूर येथे येवुन भेटणेस सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर पाटील साहेबांनी डिजिटल रेकार्डरमधील माझे आणि सर्कल देसाई यांचेतील लाच मागणी संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री.सुतार आणि माझे सांगणेवरुन सर्कल देसाई यांनी मला उद्या दि. 11/02/2020 रोजी 10.00 वा कुंभार यांचा जातीचा दाखला, आधार कार्ड व शाळा सोडल्याचे दाखल्याची झेराक्स टुकापी करून सर्कल कार्यालय, जयसिंगपूर येथे येवुन भेटणेस सांगितलेचे निश्पन्न झाले. त्यानंतर पाटील साहेबांनी मला दि. 11/02/2020 रोजी सकाळी 09.30 वा जयसिंगपूर रेल्वे स्टेशन परिसरामध्ये भेटणेस सांगितले व संपर्कात राहणेस सांगुन कारवाईबाबत गोपणीतेच्या सुचना देवुन मला घरी पाठविले होते.दि. 11/02/2020 रोजी ठरल्याप्रमाणे पोनि पाटील साहेबांनी सकाळी 09.00 वा चे सुमारास फोन करून जयसिंगपूर कडे येत असल्याचे सांगुन जयसिंगपूर रेल्वे स्टेशन ते उदगांव जाणारे रोडवर येवुन भेटणेस सांगितले. त्यामुळे मी त्यांना भेटणेससाठी जयसिंगपूर रेल्वे स्टेशन ते उदगांव रोडकडे गेलो असता, तेथे पोनि पाटील साहेब व त्यांचेकडील स्टाफ त्यांचेकडील टाटा सुमो गाडीने येवुन थांबले होते. त्यांचेजवळ गेल्यावर पोनि पाटील यांनी मला त्यांचे गाडीमध्ये बोलवुन घेवुन परत आपली तसेच सोबतचे स्टाफ व पंचांची ओळख करून दिली. त्यानंतर श्री.पाटील साहेबांनी मला व दोन्ही पंचांना जयसिंगपूर भागचे सर्कल देसाई हे माझेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे? याबाबत प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगुन दि. 10/02/2020 रोजीप्रमाणेच पंच नं. 1 म्हणुन सुतार व पंच नं. 2 पाटील हे काम पाहतील असे सांगितले. त्यानंतर त्यांनी दि. 10/02/2020 रोजी वापरलेले मेमरी कार्ड त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डरमध्ये घालून त्यामध्ये पुर्वीचे पुर्वी संभाषण ध्वनिमुद्रीत असल्याची माझी व पंचांची खा◌ं◌ं◌ंत्री करून दिली. मला व पंच श्री.सुतार यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना देवुन त्यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 10.06 वा.चालू करुन तो माझे गळयात अंगावरील शर्टचे आतील बाजुस सोनेरी चेनच्या सहाय्याने अडकवून दिला व मला आणि पंच श्री.सुतार यांना माझेकडील फोर्ड आयकान कारने सर्कल कार्यालय, जयसिंगपूर येथे सर्कल देसाई यांची भेट घेणेकरीता पाठविले. तेथे गेला तेव्हा सर्कल देसाई तेथे आलेले नव्हते त्यामुळे मी थोडयावेळाने त्यांना माझे मोबाईलवरून फोन केला. परंतु त्यांनी माझा फोन उचलला नाही. त्यामुळे मी व पंच सुतार त्यांची वाट पाहत तेथे थांबुन राहिलो होतो. थोडयावेळाने सर्कल देसाई हे त्यांचे मोटर सायकलवरून तेथे आले. त्यावेळी त्यांचेत व माझेत माझे रायल्टीचे कामाबाबत व दि. 10/02/2020 सांगितलेप्रमाणे कादपत्रांची पुर्तता केलेबाबतची चर्चा झाली. पण तेथे लोकांची वर्दळ असल्याने त्यांनी माझेशी जास्त बोलणे टाळुन मला लोकांची वर्दळ कमी झालेवर फोन करतो मग आपण बोलु असे सांगितलेने मी व पंच सुतार असे माझे कारने पाटील साहेब व त्यांचा स्टाफ थांबले ठिकाणी परत आलो होतो. तेव्हा पाटील साहेबांनी मला त्याचेकडील गाडीमध्ये बोलवुन माझेकडील डिजीटल व्हाईस रेकार्डर 11.25 वा. बंद करुन आपले ताब्यात घेतला. त्यानंतर श्री.पाटील साहेबांनी मला गाडीतुन बाहेर थांबणेस सांगुन पहिल्यांना पंच सुतार यांचेशी चर्चा केली. त्यानंतर मला परत गाडीमध्ये बोलवुन त्यांनी माझेकडे घडलेल्या घटनेबाबत विचारणा केली असता, मी त्यांना वरीलप्रमाणे हकीकत सांगुन दि. 10/02/2020 रोजी सांगितलेली कागदपत्रे घेवुन लोकांची वर्दळ असल्याने कार्यालयात आलेल्या लोकांची कामे संपवुन फोन करतो असे सांगितले असल्याचे सांगितले. त्यानंतर पाटील साहेबांनी डिजिटल रेकार्डरमधील माझे आणि सर्कल देसाई यांचेतील लाच मागणी

संदर्भातील ध्वनीमुद्रीत संभाषण ऐकले. सदर ऐकले संभाशणावरुन व पंच श्री.सुतार आणि माझे सांगणेवरुन सर्कल देसाई यांनी माझेकडील कागदपत्रे आपणाकडे घेवुन कार्यालयात आलेल्या लोकांची कामे पुर्ण झालेवर फोन करतो ( मुळ फिर्याद सोबत जोडली आहे. )

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले): SHIVANAND BALAPPA KUMBHAR(SI (Sub-Inspector)) / PSMH27196 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद):

**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

रोहित कृपाल मगदूम

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

शिरोळ पोलीस ठाणे

जि. कोल्हापूर

**Name** (नाव): SHIVANAND BALAPPA KUMBH

**Rank**(पद): SI (Sub-Inspector)

**No.**(सं.): PSMH27196